0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, एपीएमसी पोलिस स्टेशन, नवी मुंबई यांचेकडून दि.०२/१२/२०१० रोजी प्राप्त झालेली कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल /६-अ/प्र.क्र.१३५/२०१०/जा.९२५, दिनांक १४/१२/२०१०.

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एपीएमसी पोलिस स्टेशन, नवी मुंबई यांचे दि.०३/०१/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

४) रफिक अहमद टीमल चौधरी व टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे मालक चारुदास रामचंद्र घोडगे यांचे वतीने ॲड. नरेश प्रधान यांचे दि.०३/०१/२०११ चे स्वतंत्र लेखी निवेदन.

५) सहाय्यक पोलीस निरीक्षक, एपीएमसी पोलिस स्टेशन यांचा दि.११/७/२०११ रोजीचा अहवाल

६) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल /६-अ/प्र.क्र.१३५/२०१०/जा.६०८, दिनांक २९/०७/२०११

७) टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे मालक चारुदास रामचंद्र घोडगे यांचे दि.०९/०८/२०११ चे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१३५/२०१०/जा. ६८३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक :२६ /०८/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

ए.पी.एम.सी. मार्केट ट्रक टर्मिनल जवळ मोटार टँकर क्रमांक एमएच-४३-ई-१८३८ हा येणार असून त्यामध्ये फर्नेस ऑईल असून त्यातील चालकाने जवळ जवळ निम्मे फर्नेस ऑईल कोठेतरी विकले असून त्यामध्ये दुसरे द्रव्य मिसळले आहे. ही कृती करण्यासाठी त्याने त्याला ठरवून दिलेला मार्ग बदलून तो वरील ठिकाणी येणार आहे, अशी खात्रीलायक खबर परिमंडळ १ चे पोलिस अप आयुक्त यांना दिनांक ३०/११/२०१० रोजी मिळाल्याने, ट्रक टर्मिनसच्या बाजूच्या रस्त्यावर पोलिस पथकाने साध्यावेशात दोन पंचासह सापळा लावला. सदर पोलिस पथक सापळा लावून उभे असंतानाच मिळालेल्या माहितीतील टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ हा ए.पी.एम.सी. कांदा

बटाटा मार्केटच्या बाजूने येत असताना दिसला. सदर ट्रकला थांबवून त्यातील चालकास ताब्यात घेऊन त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव रफिक अहमद टिमल चौधरी असे सांगून, त्याच्याकडे गाडीतील मालाविषयी विचारपूस करता गाडीमध्ये १०,००० लिटर फर्नेस ऑईल असून ते इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., न्हावाशेवा येथून भरुन ते तुर्भे येथे खाली करावयाचे असल्याबाबत माहिती सांगून त्याबाबतचे चलन दाखविले. सदर चालकास त्याचा ठरवून दिलेला मार्ग सोडून ए.पी.एम.सी. मार्केट परिसरात येण्याविषयी विचारले असता, त्याने कोणतेही संयुक्तीक कारण दिले नाही. त्यामुळे त्यास ताब्यात घेऊन पोलिस ठाणेत आणून विचारपूस केली असता, या गाडीतील बरेचसे फर्नेस ऑईल रसायनी येथील यशवंत शेठ यांचे धंद्यावर विक्री केली असून, सदर ठिकाणी टँकरला कंपनीने लावलेले सील अलगद काढून त्यातील फर्नेस ऑईल काढून घेऊन दुसरा द्रव्य पदार्थ भरण्याचे काम मदन सिंग, बंटू, अरमान, फईम, लाला व यशवंत शेठ करतात व त्यानंतर हेच इसम कंपनीने लावलेले सील पूर्ववत करतात. काढून घेतलेल्या फर्नेस ऑईलच्या बदल्यात प्रति लिटर १० रुपये प्रमाणे रक्कम त्याला दिली जात असल्याचे त्यांने सांगितले.

सदर फर्नेस ऑईल खरेदी विक्रीसाठी मा.जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या परवानगीची आवश्यकता असून त्यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे मालाची वाहतूक करणे बंधनकारक असताना यातील चालकाने स्वत:चे फायद्यासाठी तो चालवीत असलेल्या टँकरचा मार्ग बदलून रसायनी येथे त्यातील मालाची विक्री केली.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन शासन नियंत्रित फर्नेस ऑईलची खरेदी करुन त्यामध्ये बेकायदेशिररित्या द्रव पदार्थ मिसळून त्याची अवैधमार्गाने वाहतूक, विक्री व साठवणूक केल्याचे दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द एपीएमसी पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. II १०९/२०१० दि.३०/११/२०१० अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ | १ नग | ४,००,०००/- |
| २ | सदर टँकरमधील द्रवपदार्थ मिश्रीत फर्नेस ऑईल | १०००० लिटर | ३,११,५३९/- |
| | | एकूण | ७,११,५३९/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, एपीएमसी पोलिस स्टेशन, नवी मुंबई यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या


RATIONING ... HEAD OF ... MUMBAI

अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ३०/१२/२०१० रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दि. ३०/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे मालक चारुदास रामचंद्र धोडगे उपस्थित राहिले. तथापी, सदरची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली व पुढील सुनावणी दिनांक ०३/०१/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दि. ३०/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री शिरीष के. पवार उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले.

दि. ३०/१२/२०१० रोजीच्या सुनावणीस टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे चालक रफिक अहमद टिमल चौधरी तसेच ॲड. नरेश प्रधान हे त्यांचे अशिल टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे मालक चारुदास रामचंद्र धोडगे हे वकालतनाम्यासह उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तथापी, सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक ११/०१/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दि. ११/०१/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री शिरीष के. पवार उपस्थित राहीले. तथापी, सदर सुनावणीसही इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहीले नाही.

प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेला द्रव पदार्थ कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच त्यात भेसळ होती किंवा कसे ? याकरीता रासायनिक पृथ:करण अहवालाची अत्यंत आवश्यकता असल्याचे सदरचा पृथ:करण अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रकरण अंतिम निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

तद्नंतर जप्त केलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यांचा रासायनिक पृथ:करण अहवाल, तपासी पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचे वाचावे क्र. ५ अन्वये या कार्यालयास प्राप्त झाला. सदर रासायनिक पृथ:करण अहवालाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी म्हणून वाचावे क्र. ६ अन्वये नोटीस बजावून दिनांक ०९/०८/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे मालक चारुदास रामचंद्र धोडगे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ७ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तथापी, सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेला द्रवपदार्थ ज्वलनशील असून, त्याची त्वरीत विल्हेवाट लावणे अगत्याचे आहे. सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात येत आहे.

**युक्तिवाद :-**

तपासी पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री शिरीष पवार यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेल्या निवेदनात, नमुद गुन्ह्यात जप्त केलेल्या फर्नेस ऑईलमध्ये कोणतेतरी इतर द्रव्य मिसळले असल्याची माहिती अटक केलेल्या चालकाने दिली आहे. सदर जप्त मुद्देमाल टँकरसह पोलीस ठाणे येथे ठेवण्यात आलेला असून, तो ज्वलनशील असल्याने मुद्देमालाच्या विल्हेवाटीची कार्यवाही होणेबाबत नमुद केले आहे.

जप्त टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे चालक रफिक अहमद टिमल चौधरी यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेल्या निवेदनात, दिनांक ३०/११/२०१० रोजी धोंडगे यांचे मालकीचे टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ मध्ये इंडियन ऑईल कंपनी, नाव्हा शेवा येथून १०००० लिटर फर्नेस ऑईल भरला. सदरचे फर्नेस ऑईलने भरलेला टँकर सँडोज कंपनी, तुर्भे नवी मुंबई येथे घेवून जात असतांना कंपनीच्या गेटवर पोलीसांनी गाडी अडविली व त्याला अेपीएमसी पोलीस ठाणे येथे आणले. टँकरमधील माल हा गैरकायदेशीररित्या दुसऱ्या गाडीत भरत होतास, असे पोलीसांनी सांगून त्याचेकडील चलन पोलीसांनी काढून घेतले. त्याला याबाबत पुन्हा काहीही माहित नाही व कोणत्याही मालाची त्याने चोरी केली नाही. त्याचेवर पोलीसांनी खोटी केस केली आहे, असे नमुद केले आहे.

ॲड. नरेश प्रधान यांनी त्यांचे अशिल टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे मालक चारुदास रामचंद्र धोंडगे यांचे वतीने सुनावणीचे वेळी सादर केलेल्या लेखी निवेदनात, जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ हा त्यांचे अशिल चारुदास रामचंद्र धोडगे यांचे नावे आहे. सदर वाहन पोलीस स्टेशन मध्ये असून, वाहनाची काळजी घेतली नाही तर त्याचे मुल्य कमी होण्याची शक्यता आहे. जप्त केलेले फर्नेस ऑईल सॅण्डोज कंपनी, तुर्भे येथे वितरण करायचे होते. चालक व क्लिनर यांनी केलेल्या गुन्ह्याची माहिती टँकर मालकास नव्हती. म्हणजेच घडलेला संपूर्ण गुन्ह्याबद्दल टँकर मालकास माहिती नव्हती. सदर टँकर व टँकरमधील मुद्देमाल सुपूर्तनामा करुन देण्याची विनंती आहे. त्याचप्रमाणे भारत सरकारच्या परिपत्रकात फर्नेस ऑईल जीवनावश्यक वस्तूमधून कमी केलेले आहे, असे नमूद केले आहे.

पृथ:करण अहवालाच्या अनुषंगाने दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे मालक चारुदास रामचंद्र धोडगे यांनी युक्तिवाद केला की, ते सदर टँकरचे मालक असून, सॅण्डोज प्रा.लि. तुर्भे येथे पोहचविण्याकरीता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन कंपनीतून फर्नेस ऑईल भरण्याकरीता टँकर

चालकाला सांगीतले. त्याप्रमाणे चालकाने फर्नेस ऑईल टँकरमध्ये भरुन तुर्भे येथील कंपनीत न नेता मध्येच फर्नेस ऑईल काढून त्यामध्ये कोणतेतरी द्रवपदार्थ मिक्स केले असावे. या घटनेशी त्यांचा काहीही संबंध नाही व चालकाने केलेल्या कृतीबध्दल त्यांना काहीही माहिती नाही. या टँकरच्या व्यवसायावरच त्याच्या कुटूंबाचे उदरनिर्वाह अवलंबून आहे. तरी सदर टँकर परत मिळावा, असे सांगून तसे निवेदन सादर केले.

सदर सुनावणीस इतर आरोपी / अपचारी तसेच तपासी पोलीस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी पुढील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी दिनांक ३०/११/२०१० रोजी परिमंडळ १ चे पोलिस उपायुक्त यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार पोलिस पथकाने साध्यावेशात दोन पंचासह ए.पी.एम.सी. मार्केट ट्रक टर्मिनल जवळ सापळा लावला असता, मिळालेल्या माहितीतील टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ हा ए.पी.एम.सी. कांदा बटाटा मार्केटच्या बाजूने येत असताना दिसला. सदर टँकरला थांबवून चालक रफिक अहमद टिमल चौधरी याचेकडे गाडीतील मालाविषयी विचारणा केली असता, गाडीमध्ये १०,००० लिटर फर्नेस ऑईल असून ते इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., न्हावाशेवा येथून भरुन ते तुर्भे येथे खाली करावयाचे असल्याबाबत माहिती सांगून त्याबाबतचे चलन दाखविले. सदर चालकास त्याचा ठरवून दिलेला मार्ग सोडून ए.पी.एम.सी. मार्केट परिसरात येण्याविषयी विचारले असता, त्याने कोणतेही संयुक्तीक कारण दिले नाही. त्यामुळे त्यास ताब्यात घेऊन पोलिस ठाणेत आणून विचारपूस केली असता, या गाडीतील बरेचसे फर्नेस ऑईल रसायनी येथील यशवंत शेठ यांचे धंद्यावर विक्री केली असून, सदर ठिकाणी टँकरला कंपनीने लावलेले सील अलगद काढून त्यातील फर्नेस ऑईल काढून घेऊन दुसरा द्रव्य पदार्थ भरण्याचे काम मदन सिंग, बंटू, अरमान, फईम, लाला व यशवंत शेठ करतात व त्यानंतर हेच इसम कंपनीने लावलेले सील पूर्ववत करतात. काढून घेतलेल्या फर्नेस ऑईलच्या बदल्यात प्रति लिटर १० रुपये प्रमाणे रक्कम त्याला दिली जात असल्याचे त्यांने सांगितले. त्यानुसार सदर टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ व त्यामधील १०००० लिटर फर्नेस ऑईलचा साठा जप्त करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणी इतर आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. यावरुन त्यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसून कोणताही खुलासा

करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे तसेच नोटीस मधील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या द्रवपदार्थाचे नमुने न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालिना यांचेकडे रासायनिक पृथ:करणासाठी पाठविण्यात आले असता, त्यांचेकडून प्राप्त झालेल्या रासायनिक पृथ:करण अहवालात, Exhibit nos. 1, 2 and 3 contains furnace oil and water असे नमुद केले आहे. म्हणजेच सदर गुन्ह्यात जप्त केलेला द्रवपदार्थ हा पाणी मिश्रीत फर्नेस ऑईल असल्याचे स्पष्ट होते.

जप्त टँकरचे चालक रफिक अहमद टिमल चौधरी यांनी, सदर गुन्ह्याबाबत त्याला काहीही माहिती नसुन, कोणत्याही मालाची चोरी केली नाही. त्याचेवर पोलीसांनी खोटी केस केली, असा खुलासा सुनावणीचेवेळी केला आहे. तथापी, तपासी पोलीस अधिकारी यांनी केलेल्या खुलाशात, नमुद गुन्ह्यात जप्त केलेल्या फर्नेस ऑईलमध्ये कोणतेतरी इतर द्रव्य मिसळले असल्याची माहिती यात अटक केलेल्या चालकाने दिली असल्याचे नमुद केले आहे. त्याचप्रमाणे घटनास्थळी टँकर चालकाने दिलेल्या जबाबात, सदर जप्त टँकरमधील बरेचसे फर्नेस ऑईल रसायनी येथील यशवंत शेठ यांचे धंद्यावर विक्री केली असल्याचे पंचनाम्यात नमुद केले आहे. प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेला द्रवपदार्थ हा पाणी मिश्रीत फर्नेस ऑईल असल्याचा रासायनिक पृथ:करण अहवाल न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेला आहे. यावरुन आरोपी टँकर चालक याने सबंधिताशी संगणमत करुन जाणीवपूर्वक व स्वत:च्या फायद्यासाठी शासन नियंत्रित फर्नेस ऑईलने भरलेला टँकर नियोजित ठिकाणी न नेता, त्यामध्ये बेकायदेशिररित्या दुसरा द्रवपदार्थ मिसळून त्याची अवैधमार्गाने वाहतूक, विक्री व साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल असून, याबाबत मा.न्यायालयात योग्य ती सत्यसत्यता तपासली जाईलच. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण पाणी मिश्रीत फर्नेस ऑईलचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ हा चारुदास रामचंद्र धोडगे यांचे मालकीचा असल्याचे त्यांनी सादर केलेल्या वाहन नोंदणी प्रमाणपत्रावरुन दिसून येते. तसेच टँकर मालक चारुदास रामचंद्र धोडगे यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन कंपनीतून टँकरमध्ये फर्नेस ऑईल भरुन ते सॅण्डोज प्रा.लि. तुर्भे येथे पोहचविण्याकरीता टँकर चालकाला सांगीतले. त्याप्रमाणे चालकाने फर्नेस ऑईल टँकरमध्ये भरुन तुर्भे येथील कंपनीत न नेता मध्येच फर्नेस ऑईल काढून त्यामध्ये कोणतेतरी द्रवपदार्थ मिक्स केले असावे. या घटनेशी त्यांचा काहीही संबंध नसून चालकाने केलेल्या कृतीबध्दल त्यांना काहीही माहिती नसल्याचे नमुद केले आहे. टँकर मालकाने दिलेल्या निवेदनावरुन टँकर मालकाचे अपरोक्ष जरी चालकाने त्यांचे

वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. तथापी सदर टँकरच्या व्यवसायावरच त्याच्या कुटूंबाचे उदरनिर्वाह अवलंबून आहे, ही बाब विचारात घेता, शासनाचे परिपत्रक क्र. जीवका-१००५/प्र.क्र.४३८/ ना.पु.२३, दिनांक ३० ऑगष्ट, २००५ मधील निर्देशानुसार सदरचा जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ हा त्याच्या एकूण किंमतीच्या ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर टेम्पो मालकास परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये एपीएमसी पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ाा १०९/२०१० दि.३०/१०/२०१० मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) जप्त करण्यात आलेला पाणी मिश्रीत फर्नेस ऑईलचा संपूर्ण एकुण १०००० लिटर साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला पाणी मिश्रीत फर्नेस ऑईलचा साठा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०-पी, डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांना देवून, त्यापोटी त्यांचेकडून प्राप्त होणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ हा त्याच्या एकुण किमतीच्या ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर त्याच्या मालकास परत करण्यात यावा.

४) सदरची बँक हमी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी टँकर मालकाची राहील.

५) या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत सदरहू टँकर वाहन विक्री करता येणार नाही व कोणासही हस्तांतरण करता येणार नाही.

६) तथापी, या वाहनाच्या मालकाने अशी बँक हमी सादर न केल्यास सदर वाहनाची पोलिसांनी नियमानुसार जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

0008

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे मालक
२) टँकर क्र. एमएच-४३-ई-१८३८ चे चालक, रफिक अहमद टिमल चौधरी
३) रसायनी येथील यशवंत शेठ
४) मदन सिंग
५) बंटू
६) अरमान
७) फईम
८) लाला

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एपीएमसी पोलिस स्टेशन, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, एपीएमसी पोलिस स्टेशन, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०-पी, डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई १० यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

~~४)~~ निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

E:\Aminaldata\Aminal Aadesh\Aadesh.doc